# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-७४ दिनांक - ०४/०३/२०२४

## प्रेसनोट

**राष्ट्रीय स्तरावर चोरीचे वेगवेगळयां कंपनीचे ट्रक, आयशर टेम्पो व इतर वाहने चोरी करुन, बनावट कागदपत्रे तयार करुन त्याची विक्री करणारी टोळी निष्पन्न करुन, ०४ आरोपी जेरबंद - विविध राज्यातुन चोरी केलेली रुपये ७,३२,४१,०००/- (सात करोड बत्तीस लाख एक्केचाळीस हजार किंमतीची ४७ वाहने जप्त.**

**- गुन्हे शाखा कक्ष ०१ ची कामगीरी**

----ooooo----

दि १५/०२/२०२१ रोजी रात्रौ ०८.०० वा. ते दिनांक १६/०२/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० दरम्यान अमर पैलेस ब्रिज जवळ रोडचे बाजुस फिर्यादी रमेश जसवंतलाल चौधरी वय- ४३ वर्ष रा. बोरीवली पश्चिम, मुंबई यांनी त्यांचा एम.एच./४७/वाय/४९९५ या क्रमांकाचा हायवा टिपर/ट्रक पार्क केला असताना कोणीतरी तो चोरुन नेला अशी तक्रार दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुरक्र १३१/२०२३ भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच दि ३०/०६/२०२१ रोजी रात्रौ ०१.३० वा. ते दिनांक ०१/०७/२०२१ रोजी सकाळी ०८.०० दरम्यान नागाई देवी मंदीराच्या बाजुला, वालीव, वसई पुर्व, ता. वसई, जिल्हा पालघर येथे फिर्यादी श्री रामप्रकाश हरिराम यादव वय- ४० वर्ष, रा. नालासोपारा पुर्व, जि. पालघर यांनी त्यांचा MH/48/AY/3453 या क्रमांकाचा आयशर टेम्पो पार्क केला असताना कोणीतरी तो चोरुन नेला अशी तक्रार दिल्याने वालीव पोलीस ठाणे येथे गुरक्र ६२८/२०२३ भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

मा. पोलीस आयुक्त सो, मा अपर पोलीस आयुक्त सो व मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सो यांनी मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात क्षेत्रात मागील ३/४ वर्षात वाहन चोरी संदर्भातील उघडकीस न आलेल्या गुन्हयांचा तपास करुन सदर गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा मार्फत तपास करीत असताना सपोनि प्रशांत गांगुर्डे यांना मिळालेल्या माहीतीप्रमाणे तपास करण्यात आला. त्याप्रमाणे आरोपीत नामे १) अजहर अकबर शेख वय-३५ वर्षे, व्यवसाय-गॅरेज, मुळ रा. धारखेड परिसर, ता. व जिल्हा छत्रपती संभाजी नगर, २) समीर नसीर खान वय ४१ वर्षे, रा. खंडाळा, ता.

वैजापुर, जि. छत्रपती संभाजी नगर, ३) मोहम्मद शकील मोहम्मद शौकत शाह वय-४८ वर्षे व्यवसाय-गाडी खरेदी विक्री रा. वलगाव रोड, अमरावती व ४) शेख नशीर शहजादमियॉ वय-४३ वर्षे, व्यवसाय-ड्रायव्हर/गाडी खरेदी विक्री.रा. नांदेड यांना ताब्यात घेउन अटक करण्यात आली व मा. न्यायालया समक्ष हजर करुन पोलीस कोठडी रिमांड प्राप्त करुन योग्य तो तपास करण्यात आला.

तपासा दरम्यान आरोपीतांनी प्रथमतः खोट्या कागदपत्रांच्या आधारे गाड्या अस्तित्वात नसताना अरुणाचल प्रदेश, नागलँड इ. राज्यांतील विविध आर.टी.ओ. कार्यालयामध्ये गाड्यांचे रजिस्ट्रेशन करुन रजिस्ट्रेशन नंबर व इतर कागदपत्रे प्राप्त केली. त्या कागदपत्रांच्या आधारे सदरची वाहने महाराष्ट्र राज्यात पुन्हा रजिस्ट्रेशन करावयाची आहेत असे सांगुन संबंधीत आर.टी.ओ. कार्यालयाची ऑनलाईन एन.ओ.सी. प्राप्त केली. तदनंतर कागदपत्रांवर नमुद असलेल्या मेक आणि मॉडेलप्रमाणे वेगवेगळया राज्यांतुन गाड्या चोरी केल्या. चोरलेल्या गाड्यांचे मुळ इंजिन नंबर, चेसिस नंबर व इतर ओळख पटविण्यासाठी लागणारे नंबर खोडुन त्यावर बनावट कागदपत्रांवरील इंजिन, चेसिस नंबर प्रिंट करुन महाराष्ट्रातील आर.टी.ओ. मध्ये पुन्हा रजिस्ट्रेशन केले व त्या गाड्या इतर लोकांना विक्री केल्या.

तपासामध्ये आरोपीतांकडुन एकुण ७,३२,४१,०००/- किं.ची चोरीची ४७ वाहने (त्यामध्ये टाटा ट्रक - १४, हायवा टिपर - १०, आयशर टेम्पो - ८, अशोक लेलँड ट्रक/टेम्पो - ९, मारुती सुझुकी अर्टीगा - १, मारुती सुझुकी वॅगनार - १, मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर - १, टोयोटा इनोव्हा - १, फोर्स क्रुझर - १ व महीन्द्रा जितो - १) जप्त करण्यात आली असुन त्यापैकी १६ वाहने चोरी झालेबाबत खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नंबर |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे (मि.भा.व.वी.) | ६२८/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ४६५,४६८,४७१, ३४ प्रमाणे |
| २ | वाकोला पोलीस ठाणे जिल्हा मुंबई | २८८/२०१८ भादवीस ३७९ प्रमाणे |
| ३ | बिकेसी पोलीस ठाणे जिल्हा मुंबई | ४३/२०२१ भादवीस ३७९ प्रमाणे |
| ४ | दौलताबाद पोलीस ठाणे जिल्हा छत्रपती संभाजी नगर | ६८/२०२२ भादवीस ३९२,३४ प्रमाणे |
| ५ | चाकण पोलीस ठाणे (पिंपरी चिंचवड) | ७८६/२०२३ भादवीस ४०६ प्रमाणे |
| ६ | चिखली पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड पो.आयुक्तालय | ३२/२०२२ भादवीस ३७९ प्रमाणे |
| ७ | अंबेजोगाई पोलीस ठाणे जिल्हा बिड | ३८२/२०२३ भादवीस ३७९ प्रमाणे |
| ८ | हडपसर पोलीस ठाणे (पुणे शहर ) | ८२०/२०२२ भादवीस ४५७,३८० प्रमाणे |
| ९ | रेणापुर पोलीस ठाणे जिल्हा लातुर | १९२/२०२३ भादवीस ३७९ प्रमाणे |
| १० | पुंडलीक नगर पोलीस ठाणे छत्रपती संभाजी नगर पो.आयुक्तालय | ०३०/२०२३ भादवीस ३७९ प्रमाणे |
| ११ | एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे जिल्हा जळगांव | ६८७/२०२२ भादवीस ३७९ प्रमाणे |
| १२ | येरवडा पोलीस ठाणे पुणे पो.आयुक्तालय | ०३/२०२२ भादवीस ३७९ प्रमाणे |
| १३ | जानी पोलीस ठाणे जिल्हा मेरठ, रा. (उत्तरप्रदेश) | ४१/२०२० भादवीस ३७९ प्रमाणे |
| १४ | राहुरी पोलीस ठाणे जिल्हा अहमदनगर | ९५४/२०२२ भादवीस ३७९ प्रमाणे |
| १५ | वडखळ पोलीस ठाणे जिल्हा रायगड | ६९/२०२० भादवीस ३७९ प्रमाणे |
| १६ | कामा पोलीस ठाणे जिल्हा भरतपुर रा. (राजस्थान) | ३८३/२०२२ भादवीस ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी मा श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त साो, मा. श्री श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त साो, मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त साो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी कैलास टोकले. सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, सफौ राजु तांबे, सफौ संदीप शिंदे, पोहवा/९७००९ अविनाश गर्जे, पो.हवा/९८००७ संजय शिंदे, पोहवा/०००२३ संतोष लांडगे,पोहवा/०००२४ पुष्पेंद्र थापा, पो.हवा./०६०३४ सचिन हुले, पोहवा/०६०३७ सचिन सावंत, पो.हवा./०६०९२ विजय गायकवाड, पो.हवा/०८०११ समिर यादव, पो.हवा./१००४९ सुधीर खोत, पो.हवा./१२०३२ विकास राजपुत, पो.कॉ./०७११५ प्रशांत विसपुते, पो.कॉ./१४०१४ सनी सुर्यवंशी, मसुब/ किरण आसवले, सफौज. सतोष चव्हाण सायबर विभाग यांनी केली आहे. तसेच सदर गुन्हयांचा तपास सपोउपनि संदिप शिंदे व पोहवा-०००२३/संतोष लांडगे करीत आहेत.

।।।।।